**अपारंपरिक प्रकल्पांच्या विकासासाठी**
**ऊर्जा अंकुर निधीची स्थापना**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.अपाऊ-२००५/प्र.क्र.२१९३/ऊर्जा-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २००६

वाचा- १) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांचे पत्र क्रमांक जीईटी -००१/२००५-०६/३३४४, दिनांक ७ जुलै, २००५.
२) शासन अधिसूचना क्रमांक इवीटी -२००४/प्रक ४२/ऊर्जा-१, दिनांक ११ मे, २००४.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतापासून वीज निर्मिती ही राज्यातील एकूण वीज निर्मितीच्या १० टक्के असावी असे धोरण अवलंबिले आहे. त्या अनुषंगाने शासनाने १९९६ पासून अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांद्वारे (पवन ऊर्जा, बगास, सौर ऊर्जा ) वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. राज्यात अपारंपरिक ऊर्जा विकासास बराच वाव आहे. यासाठी राज्यातील औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज वापरावर अधिभार लावून हरित ऊर्जा निधीची स्थापना करण्यात आली आहे.

अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील विविध स्त्रोतांसाठी प्रायोजित केलेल्या लक्ष्यांच्या पुर्ततेसाठी पोषक वातावरण तयार करून सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकीद्वारे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांना प्राधान्याने वित्त सहाय्य उपलब्ध व्हावे व या क्षेत्राचा कालबध्दरित्या जलद गतीने विकास व्हावा या दृष्टीकोनातून अपारंपरिक प्रकल्पांच्या विकासासाठी निधीची उभारणी व त्याचे व्यवस्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा सांगोपांग विचार करुन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत:-

१. अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठी, (भारतीय ट्रस्ट अधिनियम, १८८२ अंतर्गत) एकूण रु.४१८ कोटींचा सहभाग असलेल्या ऊर्जा अंकुर निधीची स्थापना करण्यास मान्यता देण्यात येत आहे

२. मंत्री (अपारंपरिक ऊर्जा) प्रस्तावित ट्रस्टचे पदसिध्द अध्यक्ष असतील व शासनातर्फे अपर मुख्य सचिव (वित्त), सचिव (ऊर्जा) व महासंचालक, महाऊर्जा हे पदसिध्द (Ex-Officio) ट्रस्टी असतील. तसेच या ट्रस्टवर दोन स्वतंत्र तज्ञांची निमंत्रित म्हणून नियुक्ती शासनामार्फत करण्यात येईल. मात्र त्यांना कोणत्याही प्रकारचा मतदानाचा व विश्वस्तांचा अन्य अधिकार राहणार नाही.

३. या ट्रस्टच्या जबाबदा-या व कार्यकक्षा विहीत करण्याचा आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.

४. ऊर्जा अंकुर निधीची उभारणी व व्यवस्थापन यासाठी खालील कार्यप्रणाली अवलंबिण्यात यावी:-

४.१ महाराष्ट्र वीजेच्या विक्रीवरील कर अधिनियम,१९६३ च्या कलम ५(१)(क) च्या तरतुदीनुसार, करापोटी जमा झालेल्या महसुलाची रक्कम सलग ३ वर्षाच्या कालावधीत रुपये २१८ कोटी ऊर्जा अंकुर निधीत हस्तांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर रुपये २१८ कोटीची रक्कम, पहिल्या वर्षी (२००५-०६) रु.१०० कोटी, दुस-या वर्षी (२००६-०७) रु. १०० कोटी व तिस-या वर्षी (२००७-०८) रु.१८ कोटी याप्रमाणे या निधीमध्ये हस्तांतरीत करण्यात यावी.

४.२ खाजगी गुंतवणूक व्यवस्थापन संस्था/कंपनी, बाजारातून इच्छित गुंतवणूकदारांकडून प्रति वर्षी रु.१०० कोटी, याप्रमाणे सलग २ वर्षामध्ये जमा केलेल्या रु.२०० कोटींचा सहभाग ऊर्जा अंकुर निधीत राहील. मात्र, शासकीय निधी खाजगी गुंतवणूकीच्या प्रमाणात हस्तांतरीत करण्यात यावा. खाजगी गुंतवणुकीचा निधी कमी झाल्यास, त्याच प्रमाणात शासकीय निधी शासनास परत करण्यात यावा. तसेच खाजगी गुंतवणूक, पहिल्या वर्षी रु.९८० कोटी व दुस-या वर्षी रु.१८२० कोटी, याप्रमाणे आकर्षित (Mobilise) करण्याची जबाबदारी त्या खाजगी गुंतवणूक संस्था /कंपनी यांची राहील. त्या निधीतून राज्यात १००० मे.वॅ. क्षमतेचे अपांरपरिक ऊर्जा प्रकल्प पुढील ३ वर्षात कार्यान्वित करण्यात यावे.

४.३ खाजगी गुंतवणूक व्यवस्थापन संस्था/कंपनीची निवड महाऊर्जाने स्पर्धात्मक निविदांद्वारे, या शासन निर्णयाच्या **'परिशिष्ट अ'** मध्ये दर्शविलेल्या पात्रतेच्या निकषांनुसार (qualifying criteria) करावी. निवड केलेल्या खाजगी गुंतवणूक व्यवस्थापन संस्था/कंपनी यांचेकडे निधीचे गुंतवणूक व व्यवस्थापन करण्याची जबाबदारी राहील. प्रकल्पांना भागभांडवलाच्या स्वरूपात (equity) कमाल २० टक्के वित्त सहाय्य निधीतून उपलब्ध करण्यात यावे. सेबी (SEBI) या संस्थेच्या समन्वयाने निधीचे लेखापरिक्षण महालेखापरिक्षक (Accountant General) यांचेकडून करण्यात यावे.

४.४ प्रस्तावित ट्रस्टमध्ये खाजगी गुंतवणूक व्यवस्थापन संस्था/कंपनीद्वारे स्वतंत्रपणे तीन ट्रस्टींची नेमणूक करण्यात यावी.

४.५ ट्रस्टच्या संरचनेत कोणताही बदल करण्यासाठी शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

४.६ प्रस्तावित निधीचा नियोजित कालावधी १० वर्षाचा असून तो आवश्यकतेनुसार पुढे वाढविण्यात यावा.

४.७ ट्रस्ट निधीवर मिळालेले व्याज हे शासन आणि खाजगी गुंतवणूकदार या दोघांच्या वतीने पुनर्गुंतवणूकीसाठी वापरण्यात यावे. ट्रस्टला होणारा लाभ ट्रस्टने ठरविल्या प्रमाणे शासनास व खाजगी गुंतवणूकदारास त्यांच्या गुंतवणूकीच्या प्रमाणात वाटप करण्यात यावा. तसेच निधीतील शासनाची गुंतवणूक, ट्रस्टींनी ठरविल्याप्रमाणे योग्य वेळी निर्गुंतवणूक करण्यात यावी.

४.८ अपारंपरिक प्रकल्पात उसाच्या चिपाडावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प, लघु जलविद्युत प्रकल्प, पवन ऊर्जा प्रकल्प, सौर ऊर्जा प्रकल्प, घनकच-यावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प, ऊर्जा संवर्धन (ऊर्जा बचत दिवे CFL इत्यादि ) या प्रकाराशिवाय समुद्राच्या लाटापासून वीजनिर्मिती इत्यादी प्रकल्पांचा ही समावेश करण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाने अनौ.संदर्भ क्रमांक ४७२९/कार्या १४६१, दिनांक ७.१.०६ व वित्त विभागाने अनौ.संदर्भ क्रमांक १८/०६/व्यय १६, दिनांक १२.१.२००६ अन्वये दिलेल्या मान्यते नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(उ.शं.घोईटे )
शासनाचे उप सचिव.

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
प्रधान सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय.
खाजगी सचिव, मा. मंत्री अपारंपरिक (ऊर्जा)
खाजगी सचिव, मा. मंत्री (ऊर्जा)
खाजगी सचिव, सर्व मा. मंत्री व सर्व मा. राज्यमंत्री
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ- सूत्रधार कंपनी मर्यादित
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.
महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), म्हाडा कमीशियल कॉम्प्लेक्स, येरवडा, त्रिदल नगर जवळ, पुणे ४११ ००६
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप /रालेवि-१), मुंबई
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने,

nidhi
एच-1449-2

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक अपाऊ-२००५/प्र.क्र. २१९३/ऊर्जा-७, दिनांक २१ जानेवारी २००६ चे सहपत्र

## परिशिष्ट -'अ'

## निकष

१. सदर संस्था सेबी या संस्थेकडे नोंदणीकृत झालेली असावी.

२. सदर संस्थेचे नेटवर्थ कमीत-कमी २० कोटी रुपये एवढी असावी.

३. सदर संस्थेने बँका व इतर विविध संस्थांकडून कमीत-कमी १ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक उभी केलेली असावी.

४. सध्या:स्थितीत, संस्थेच्या व्यवस्थापनाखाली किमान १ हजार कोटी रुपये गुंतवणूक निधी असणे आवश्यक आहे.

५. सदर कंपनीने २०० कोटी रुपयांची गुंतवणूक ऊर्जा निधीमध्ये जमा करण्याची जबाबदारी व खात्री देणे आवश्यक आहे. सदर गुंतवणूक दोन वर्षांच्या कालावधीमध्ये करावयाची आहे, म्हणजेच आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये रुपये १०० कोटी व आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये रुपये १०० कोटी असे एकूण रुपये २०० कोटी प्रस्तावित ऊर्जा निधीमध्ये जमा करावे लागतील. तसेच, सदर संस्था/कंपनी निधीत प्रस्तावित २४०० कोटी रुपयांची गुंतवणूक. पहिल्या वर्षी रू.९८० कोटी व दुस-या वर्षी रू.१८२० कोटीची गुंतवणूक आकर्षित करण्याची जबाबदारी स्विकारेल.

६. सदर संस्थेकडे मुलभूत सुविधांवर केंद्रीत झालेल्या निधीचे व्यवस्थापन असणे आवश्यक आहे.

७. मुलभूत सुविधा क्षेत्रात सदर कंपनीचे स्थान उच्च दर्जाचे असून, सदर संस्थेने देशात या क्षेत्रात कमीत-कमी २५० कोटी रुपयांची गुंतवणूक/कर्ज उभारणी केलेली असावी.

८. खाजगी कंपनीस, कंपनीच्या इतर ग्रुप कंपनीच्या माध्यमातून देशात मुलभूत सुविधांवर केंद्रीत प्रकल्पात कमीत-कमी २ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प प्रोत्साहित/ कार्यान्वित करण्याचे अनुभव व थेट सहभाग असणे आवश्यक आहे.

९. खाजगी कंपनीस, कंपनीच्या इतर ग्रुप कंपनीच्या माध्यमातून वीजनिर्मिती क्षेत्रातील तज्ञांचा विशेषतः अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील थेट संपर्क असावा.

१०. खाजगी कंपनीकडे खाजगी भागभांडवल गुंतवणूकीचा पुरेसा अनुभव असावा. उत्कृष्ट दर्जाची गुंतवणूक, निर्णय तत्परतेने घेण्याची क्षमता व त्यासाठी आवश्यक असणारे पाठबळ असावे. तसेच गुंतवणूकीचे Port Folio तयार करण्याची उच्च दर्जाची क्षमता असणे आवश्यक आहे. खाजगी कंपनीस, गुंतवणूकीच्या क्षेत्रात उत्कृष्ट व्यवस्थापनाचा पूर्वानुभव असणे आवश्यक आहे. तसेच कंपनीने निर्गुंतवणूक देखील यशस्वीपणे केली असावी.

---